

नमस्कार! मी दीपक, विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी विलगीकरण करण्यात आलेल्या कुटुंबांचा कचरा गोळा करण्याचे काम करणाऱ्या नगरपालिकेच्या ठेकेदाराकडे, मी आणि माझा भाऊ संजू काम करतो. मला माहीत आहे, आपल्यापैकी अनेकजण कोविड 19 महामारीच्या काळात नागरिकांची सेवा करीत आहेत. करोना व्हायरसपासून तुमचे संरक्षण होण्यासाठी आवश्यक संरक्षक सूचना मी आपल्याला सांगू इच्छितो.

**विशेष नोंध - या सूचना नियमित कार्यपद्धतीचा भाग नसून केवळ सफाई कामगारांनी कोविड 19 महामारीच्या काळात सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती अतिरिक्त काळजी घ्यावी याकडे लक्ष वेधण्यासाठी आहेत.**

## आपल्या घरातून कामावर जाण्यापूर्वी या गोष्टी आवर्जून करा-

1. आपले शरीर पूर्ण झाकले जाईल असे कपडे वापरा
2. जर आपल्याला जखम झाली असेल तर त्यावर जलरोधक पट्टी लावा
3. पालिकेने दिलेला अत्यावश्यक सेवकाचा पास आपल्याजवळ ठेवा
4. हात धुण्यासाठी साबण आणि पाणी तुमच्याबरोबर ठेवा
5. हातमोजे, मास्क, एप्रेन, बूट या वैयक्तिक सुरक्षा साधनांचा (PPE) वापर करा (जेथे मास्क उपलब्ध नसेल तेथे दोन तीन थरांच्या स्वच्छ कपड्याने नाक व तोंड झाकून घ्या)
6. कपड्यांची अतिरिक्त जोडी आपल्या बरोबर राहु द्या

## कामावर गेल्यावर या गोष्टी नक्की कराच-

1. हात साबणाने किमान 20 सेकंद धुवा
2. अनावश्यक वस्तूंना स्पर्श करणे टाळा. चेहरा, नाक, डोळे यांना स्पर्श करू नका
3. नियमित वापरायची वैयक्तिक सुरक्षा साधनांचा जसे मास्क, एप्रेन, हातमोजे यांची रोज नव्याने मागणी करून त्यांचा वापर करा.
4. केवळ आपली वैयक्तिक सुरक्षा साधने, आपल्याला देण्यात आलेली ढकलगाडी व वाहन यांनाच हाताळा
5. काम सुरू करण्यापूर्वी आपले तापमान तपासून आपण काम करण्यास योग्य असल्याची तपासणी करून घ्या
6. मास्क घालताना त्याच्या पुढील बाजूस स्पर्श होणार नाही, याची काळजी घ्या

## कामाला सुरुवात करताना खालील पद्धतीचा वापर करा-

1. दरवाजा उघण्यासाठी घंटेचा वापर करा
2. इतरांपासून किमान 4 फूट अंतर राहील याची दक्षता घ्या
3. नागरिकांना कचरा पिवळ्या पिशवीत टाकायला सांगा
4. नागरिकांनी वापरलेले मास्क, हातमोजे स्वतंत्र पिशवीत ठेवायला सांगा
5. कचरा उचलण्यास कागद किंवा सुपाचा वापर करा.
6. कचरा उचलताना अतिरिक्त काळजी घ्या, आईस्क्रीम स्टिक सारख्या कचऱ्यात लाळ असण्याची शक्यता असते
7. कचरापेटीस स्पर्श करू नका, उघड्या हाताने कचरा घेऊ नका
8. विलगीकरण केलेल्या घरातून कचरा गोळा करताना, त्याची विल्हेवाट लावताना काहीही खाणे पिणे टाळा
9. कचरा गोळा करून योग्य ठिकाणी टाकल्यावर रिपोर्ट करण्याच्या ठिकाणी गेल्यावर सर्व वैयक्तिक सुरक्षा उपकरणे काढून सांगितलेल्या जागी टाकून द्या

## कार्यालयाच्या स्थळी (वॉर्ड / क्षेत्रीय) काम संपवून गेल्यावर-

- अंगावर घातलेली वैयक्तिक सुरक्षा साधने काढा
- वापरलेले कपडे बदलून बॅगमध्ये ठेवा
- कामावर वापरलेले कपडे, वाहने धुवून जंतुविरहीत करा
- आपले हात साबणाने किमान 20 सेकंद स्वच्छ धुवा
- जाण्यापूर्वी आपले तापमान तपासून आपण घरी जाण्यास योग्य असल्याची खात्री करून घ्या
- घरी जाण्याचा मास्क घाला
- घरी गेल्यावर सर्वप्रथम सुरक्षा साधने, वापरलेले कपडे स्वच्छ धुवून कोरड्या जागी वाळत टाका नंतरच कुटुंबियांना भेटा

**सर्दी, ताप,खोकल्यासारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घ्या**

**कोरोना व्हायरस वर लढाईत आपण सुरक्षित राहून विजय मिळवूया**

Safety and Dignity to Sanitation Work | Urban Management Centre with support from BMGF | manvita@umcasia.org